गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले · अंक ४४ वा · शुक्रवार ३० जून २०२३ · पाने ४ · किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 44 | Date : 30/06/2023 | blow : Friday | Page 4 | Price 4

## आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा संपन्न

# बा विठ्ठला.. समाजातील प्रत्येक घटकाला सुखी, समृद्ध कर, मुख्यमंत्र्यांचे विठ्ठलाच्या चरणी साकडे



पंढरपूर/प्रतिनिधीः बळीराजाला चांगले दिवस येऊ देत, त्याच्यावरचे अरिष्ट दूर होऊ दे. पाऊस पडू दे, राज्य सुजलाम, सुफलाम होऊ दे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, वारकरी, धारकरी असा राज्यातील प्रत्येक घटक सुखी समाधानी होऊ देत. त्याच्या आयुष्यात चांगले दिवस येऊ देत, असे साकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आषाढी एकादशीच्या मुख्य शासकीय महापूजेवेळी विठूरायाच्या चरणी घातले.

आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी त्यांच्या सुविद्य पत्नी लता शिंदे तसेच मानाचे वारकरी दांपत्य भाऊसाहेब मोहिनीराज काळे व मंगल भाऊसाहेब काळे यांच्यासोबत विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा केली. महापूजेनंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्यावतीने आयोजित मानाच्या वारकऱ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, ग्रामविकास व वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन, बंदरे व खनीकर्म मंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आषाढी वारीत लाखो भाविक पांडुरंगाच्या दर्शनास आले आहेत. पंढरी व परिसर अवघा पांडुरंगमय झाला आहे. आषाढी वारीत वारकऱ्यांच्या आरोग्याला शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यासाठी तीन ठिकाणी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातून भाविकांची आरोग्य सेवा करणे विठ्ठल पुजेसारखेच आहे.

या वर्षीच्या वारीत स्वच्छतेचे चांगले काम झाले आहे. शासनाने दिलेल्या सूचनांनुसार प्रशासनाने उत्तम नियोजन करून वारकऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. विठ्ठलाच्या दर्शनाला ओढीने आलेल्या वारकऱ्यांचा मुख दर्शनाच्या रांगेत शासकीय पूजेच्या वेळात खोळंबा होवू नये म्हणून या काळात मुख दर्शन रांग सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे रांगेतील वारकऱ्यांचे दर्शन जलद व सुलभ झाले.

राज्य शासनाने या एक वर्षाच्या काळात जनकल्याणाचे अनेक निर्णय घेऊन सामान्य माणसाला दिलासा दिला आहे. पंढरपूर नगरपरिषदेकडील कामांसाठी नगरोत्थानमधून १०८ कोटी आणि शहरातील पाणीपुरवठा योजनेसाठी १०९ कोटी रुपयाच्या कामाला मान्यता देण्यात आली आहे. मंदिर परिसर विकास आराखड्यासाठी ७३ कोटीचा निधी उपलब्ध करून दिला आहे. पंढरपूर शहर विकास आराखडा सर्वांना विश्वासात घेऊन तयार करण्यात येईल. तसेच, ३० खाटांचे रूपांतर १०० खाटांमध्ये लवकरच करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सलग दोन वर्षे आपल्याला आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान मिळणे हे आपले भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अहमदनगर जिल्ह्यातील काळे दांपत्य मानाचे वारकरी

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या समवेत मानाचे वारकरी म्हणून शेतकरी कुटुंबातील भाऊसाहेब मोहनीराज काळे (वय ५६) मंगल भाऊसाहेब काळे (वय ५२) मु. पो. वाकडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर या वारकरी दांपत्यास शासकीय पूजेचा मान मिळाला. काळे दांपत्य । पान २ वर



### निर्मल दिंडी पुरस्कार वितरण

वारीत सहभागी होणाऱ्या अनेक दिंड्या सामाजिक प्रबोधनाचे कार्य करत असतात. या दिंड्यांचा आदर्श घेऊन 'निर्मल वारी हरित वारी ' अभियानामध्ये नागरिकांचा सहभाग वाढवावा, या उद्देशाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती यांच्यामार्फत 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्कार देण्यात येतो. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्री तारकेश्वर गड दिंडी, ता. आष्टी, जि. बीड (एक लाख रुपये व सन्मानचिन्ह), द्वितीय क्रमांक नांदेडकर मंडळीची दिंडी, ता. हवेली, जि. पुणे (७५ हजार व सन्मान चिन्ह) तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक श्री एकनाथ महाराज वारकरी शिक्षण संस्था, यशवंतनगर, पैठण जिल्हा औरंगाबाद (५० हजार व सन्मान चिन्ह) या दिंडीला प्रदान करण्यात आले.

## पवार साहेबांचं शेवटी सत्य बाहेर आलं, याचा अतिशय आनंद झाला : देवेंद्र फडणवीस



मुंबई : मागील काही दिवसांपासून राज्यात पहाटेच्या शपथविधीवरुन पुन्हा एकदा राजकारण तापले आहे. अजित पवारांसोबत पहाटेच्या शपथविधीमध्ये शरद पवारांचा हात होता, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला होता.याला पटलवर करताना शरद पवार यांनीही गुगली टाकली. आम्ही सरकारला पाठिंबा देणार होतो, पण दोन दिवसआधीच मी माघार घेतली होती. माझा पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा होता, तर दोन दिवसांत सरकार का कोसळलं ? असा प्रश्न शरद पवारांनी उपस्थित केला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पवार साहेबांचं शेवटी सत्य बाहेर आलं, मला याचा अतिशय आनंद झाला, उरलेलं अर्धसत्य मी बाहेर काढीन, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

शरद पवार साहेबांना शेवटी सत्य सांगावं लागलं, याचा मला अतिशय आनंद आहे. मी जी गुगली टाकली, त्यामुळे त्यांचं सत्य बाहेर आले. पण ते अर्धच सत्य बाहेर आलेय. उरलेले सत्य मी बाहेर काढेन. त्यांच्या गुगलीमुळे मी क्लीनबोल्ड व्हायच्या ऐवजी त्यांचे पुतणे अजित पवारच क्लीन बोल्ड झाले आहेत.अजून अर्धसत्यच बाहेर आलेय, उरलेले सत्य लवकरच बाहेर येईल, माझ्या दुसऱ्या गुगलीने उर्वरित सत्य बाहेर येईल, असे देवेंद्र पडणवीस म्हणाले. शरद पवारांनी शपथविधीच्या तोंडवर माघार घेतली, देवेंद्र फडणवीस काय म्हणाले होते ?उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रिपब्लिक या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अनेक दावे आणि गौप्यस्फोट केले. फडणवीस म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी । पान २ वर

## पंतप्रधान मोदी हे 'रोमच्या निरो' पेक्षाही असंवेदनशील; मणिपूर हिंसाचारावरून काँग्रेसचे टीकास्त्र

नवी दिल्ली : 'रोम जळत असताना निरो फिडल वाजवत होता' या प्रवृत्तीलाही लाजवेल एवढा असंवेदनशील पंतप्रधान भारताला लाभला असल्याची टीका काँग्रेसने केली आहे. मणिपूरमध्ये सुरु असलेला हिंसाचार ५२ दिवसानंतरही शमलेला नाही आणि पंतप्रधानही या हिंसाचारावर साधा 'म' सुद्धा काढत नाहीत हे या देशाचे व मणिपूरी जनतेचे दुर्दैवी असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. केंद्र सरकार स्वतः काही करत नाही आणि विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी मणिपूरच्या जनतेची विचारपूस करण्यास जात असताना त्यांना रोखले जाणे हे मोदींच्या हुकुमशाही कारभाराचा नमुना आहे, असा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले की, राहुल गांधी यांना मणिपूरमध्ये रोखल्याबद्दल भाजपा सरकारचा काँग्रेस पक्ष तीव्र निषेध करत आहे. मणिपूरची जनता केंद्र सरकारच्या मदतीची आस लावून बसली आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र मणिपूरला जळत ठेवून अमेरिकेच्या दौऱ्यावर चमकोगिरी करत असल्याची सडकून टीका पटोले यांनी केली.

काँग्रेस नेते राहुल गांधी हे हिंसाचारग्रस्त मणिपूरच्या लोकांचे दुःख जाणून घेण्यासाठी गेले होते. राहुल गांधी यांना रस्ते मार्गाने जाण्यास । पान २ वर

## गेल्या सहा महिन्यात ४,४३४ मुली बेपत्ता

### सत्ताधाऱ्यांनी बाष्कळ वक्तव्ये न करता महिलांच्या सुरक्षेकडे लक्ष द्यावं; शरद पवारांचा हल्लाबोल



मुंबई: राज्यातील महिला आणि मुलींवरील वाढत्या हल्ल्यावरुन आणि त्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नावरुन राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारवर टीका केलीय. राज्यात गेल्या सहा महिन्यात २४५८ मुली बेपत्ता आहेत आणि ही चिंतेची बाब असल्याचं शरद पवार म्हणाले. १४ जिल्ह्यातून एकून ४४३४ मुली बेपत्ता असल्याची माहितीही पवारांनी दिली. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी बाष्कळ वक्तव्य न करता कायदा आणि सुव्यवस्थेकडे लक्ष द्यावं असा सल्लाही शरद पवारांनी दिला.

शरद पवार म्हणाले की, राज्य सरकारला एक वर्ष झाले, अनेक प्रश्न समोर आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा कायदा आणि सुव्यवस्थेचा आहे. महिला आणि मुली यांच्यावर हल्ले होतायंत आणि दिवसेंदिवस त्यामध्ये वाढ होतेय ही चिंतेची बाब आहे. पुणे, ठाणे, सोलापूर आणि मुंबई मधील महापालिकेच्या क्षेत्रातली माहिती माझ्याकडे आहे. जानेवारी २०२३ पासून मुंबईतून ठाण्यातून ७२३ मुली, मुंबई ७२३ आणि सोलापूर ६७ हा असा एकूण जवळपास २४५८ मुली बेपत्ता आहेत.

शरद पवार यांनी समान नागरी कायद्याच्या । पान २ वर

### सोलापूर शहरात मोठ्या उत्साहात 'ईद उल अजहा' साजरी

## शिक्षणाबरोबर आपल्या मुलांना चांगले आचरण, संस्कार, इस्लाम, कुराणचे महत्त्व सांगा,शहर काझी मुफ्ती सय्यद अमजद अली यांचे आवाहन



सोलापूर/प्रतिनिधी :इस्लाममध्ये शिक्षणाबरोबरच चांगले संस्कारला महत्व आहे. त्यामुळे पालकांनी शिक्षणाबरोबरच आपल्या मुलांना चांगले संस्कार द्यावे, आज आपण मुलांकडून डॉक्टर, इंजिनिअर आणि श्रीमंत व्हायचे अपेक्षा ठेवतात. आपल्या मुलास चांगले व्यक्ती करा, शिक्षणाबरोबर इस्लाम, संस्कार, आचरण, वर्तन आणि कुराणचे महत्त्व आपल्या मुलांना सांगा असे आवाहन शहर काझी मुफ्ती सय्यद अमजद अली यांनी केले.

इस्लाम धर्माचा पवित्र सण ईद-उल अझहा अर्थात बकरी ईद निमित्त गुरुवार दि २९ जून रोजी शहरातील पाच ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करण्यात आली. यावेळी होटगी रोड वरील आलमगीर ईदगाह मैदानावर सकाळी साडेआठ वाजता मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली. त्यानंतर शहर काझी अमजद अली यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना बकरी ईद साजरी का करतात ? कुर्बानीचे महत्व काय आहे, आपल्या भाषणातून सांगितले.

अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी वाईट इच्छांचा त्याग करायचा आहे, म्हणजेच केवळ संपत्ती आणि पैसा खर्च करायचा नाही तर आपल्यामध्ये त्यागाची खरी भावना जागृत करायची आहे,आपण कुर्बानीच्या पशुबलीसह आपल्या खोट्या अहंकार, वाइट इच्छा आणि स्वार्थाचा त्याग करावा. इस्लाममध्ये शिक्षणाला जेवढे महत्त्व दिले जाते,तेवढेच महत्त्व चांगल्या आचरणाला दिले जाते.

प्रेषित हजरत मोहम्मद म्हणाले की, आजपर्यंत कोणत्याही पित्याने आपल्या मुलाला चांगल्या वागणुकीपेक्षा मोठी भेट दिली नाही.आज आम्ही आमच्या मुलांकडून डॉक्टर, इंजिनिअर आणि श्रीमंत व्हायचे अपेक्षा ठेवतात. परंतु या अगोदर लोकांसाठी एक चांगली आणि उपयुक्त व्यक्ती बनवणे गरजेचे आहे, असेही शहर काजी अमजद अली यांनी सांगितले

**आपल्या मुलांना हे तीन शिकवण द्या**

पालकांनी आपल्या मुलांना नेहमी खरे बोलणे शिकवावे. जर आपला पाल्य नेहमी खरे बोलत असेल तर त्याला मारू नये अन्यथा तो जीवनात कधीच खरे बोलणार नाही. आपल्या मुलांना पाच वेळा नमाज पठण करण्यासाठी सवय लावा, आपल्यापेक्षा मोठ्या व्यक्तींची, आई वडील, सर्वांची सेवा करण्यासाठी चांगले संस्कार, आचरण आणा आणि महत्त्वाचे म्हणजे पाल्य हे कुराणापासून दूर जात आहेत. त्यांना कुराणाचे महत्त्व पटवून कुराण वाचण्याची सवय लावा असे आवाहन शहर काजी अमजद अली यांनी केले.

**ए अल्लाह... हिंदू-मुस्लीममधील एकोपा, प्रेम,भाईचारा वाढू दे**

सध्या देशात इस्लामला बदनाम करण्याचे काम सुरू आहे. या दुष्ट शक्तींना लांब ठेव. देशातील हिंदू -मुस्लिममधील प्रेम, भाईचारा असेच वाढत राहो, देशात अमन, शांती कायम राहो, चांगला रोजगार, देशाचा विकास , दुष्काळ दूर होऊन मोठ्या प्रमाणात पाऊस येऊ दे अशीच प्रार्थना अल्लाहकडे मुस्लिम बांधवांनी केली.

**शहरात पाच ठिकाणी नमाज पठण**

बकरी ईद निमित्त शहरातील पाच ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवानी नमाज पठण केले. शाही आलमगिरी पानगल हायस्कूल, जुनी मिल कंपाऊंड आदिलशाही ईदगाह, आसार मैदानावर नमाज अदा करण्यात आली. रंगभवन येथील अहलेआदिस मैदानावर नमाज अदा करण्यात आली.

### ठळक बाबी.....

* होटगी रोडवर नमाज अदा झाल्यानंतर पोलीस बांधवांच्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाब देऊन केले स्वागत
* पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी होटगी रोडवरील इदगाह मैदानावर शहर काझी व मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या दिल्या शुभेच्छ
* ईदची नमाज शांततेत पार पडण्यासाठी पोलिसांचा सर्वच ईदगाह मैदानावर दर्गा, मशिदी समोर मोठा बंदोबस्त
* मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट करत ईदच्या शुभेच्छा दिल्या
* शहर काझी अमजद अली, शहर काजी अब्दुर राफे यांनी बकरी ईदच्या दिल्या सर्वांना शुभेच्छा

दैनिक
यश सिद्धि न्यूज


**✲ सुविचार ✲**

अनिश्चतेत सर्व दु:ख भरलेले असते.

# संपादकीय

## योजना आणि कादगपत्रे..

कुटुंबातील अन्य सदस्यांच्या आजाराकडे गांभीर्याने पाहिले जाते. त्यांनी उपचार करून घ्यावेत असा आग्रह धरला जाताना आढळतो. कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य राखणे महिला त्यांची जबाबदारी मानतात. स्वत:चे अनारोग्य महिलाच गांभीर्याने घेत नाहीत. आजारपणाच्या छोट्या मोठ्या खुणा जाणवल्या तरी त्याकडे दुर्लक्ष करण्याकडेच महिलांचा कल आढळतो. राज्य शासनाच्या महिला सुरक्षित तर घर सुरक्षित या मोहिमेंतर्गत मात्र राज्यातील सुमारे चार कोटी महिलांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. या मोहिमेचा दुसरा टप्पा राबवण्यात येत असल्याचे संबंधित विभागाने सांगितले. दुसऱ्या टप्प्यात ५२ हजारांपेक्षा जास्त महिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यातील तपासण्यांचे निष्कर्ष महिलांच्या वाढत्या अनारोग्याकडे लक्ष वेधून घेतात. ३० वर्षांवरील अडीच लाखांपेक्षा जास्त महिलांना मधुमेहाचे प्राथमिक निदान, चार लाखांपेक्षा जास्त जणींना उच्च रक्तदाबाचे प्राथमिक निदान, तेहतीस हजार महिलांना हृदयासंबंधित आजार तर साठ हजार महिलांमध्ये कर्करोगसदृश संशयित लक्षणे आढळून आली, असे प्रसिध्द झालेल्या वृत्तात म्हटले आहे. शासकीय योजनेने महिलांना आरोग्य तपासणीची विनाशुल्क संधी उपलब्ध करून दिली. कदाचित त्यामुळेच महिलांनी या योजेनला प्रतिसाद दिला असावा. महागडे होत जाणारे वैद्यकीय उपचार हे देखील महिलांनी त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याचे एक कारण मानले जाते. महागाई वाढत आहे. कोरोनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक अस्थिरतेने लोकांच्या बचतीवर घाला घातला. अनेकांचे रोजगार हिरावून घेतले. आरोग्य तपासणी करून घेतली आणि त्याचे निष्कर्ष विपरीत आले तर उपचारांचा खर्च करावा लागेल याची भीती महिलांना सतावत असावी. सद्य:स्थितीत हे आर्थिक संकट ओढवून घेण्याची तयारी किती महिला दाखवतात? सरकार जनहिताच्या अनेक योजना जाहीर करते. त्यांची नियोजनबध्द अंमलबजावणी केली गेली तर त्याचा फायदा लाभार्थ्यांना होतो. बऱ्याचदा योजनांचे घोडे अंमलबजावणीच्या पातळीवरच पेंड खाताना आढळते. सरकारी योजनांची प्रशासन अंमलबजावणी करते. शासकीय कर्मचाऱ्यांची काम करण्याची मानसिकता योजनांचे भवितव्य ठरवते. किती जण त्यात रस घेतात? लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवण्याचा प्रयत्न करतात? योजनांचे लाभ पोहोचवण्यापेक्षा कागदपत्रांचा अडसर पुढे केला जात असावा का?

पान १ वरुन

## बा विठ्ठला.. समाजातील प्रत्येक

२५ वर्षापासून भास्करगिरी महाराज यांच्या सोबत देवगड ते पंढरपूर पायी वारी करीत आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान मिळालेल्या वारकरी दांपत्यास एक वर्षासाठी मोफत प्रवासाची सेवा दिली जाते. त्या मोफत पासचे वितरण श्री. शिंदे यांच्या हस्ते या वारकरी दांपत्यास करण्यात आले.

कार्यक्रमाला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि प्रताप जाधव, आमदार समाधान आवताडे, भरत गोगावले, मंगेश चव्हाण, बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी भूवैकुंठ या वारीसंदर्भातील छायाचित्र पुस्तकाचे प्रकाशन तसेच 'आरोग्यदूत' या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्री.औसेकर महाराज यांनी प्रास्ताविक केले.

## पवार साहेबांचं शेवटी सत्य..

आमच्याशी असलेलं नातं तोडले. त्यानंतर आम्ही सरकारी स्थापन करण्यासाठी वेगवेगळ्या पर्यायाचा विचार करत होतो. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत येण्यास इच्छुक असल्याचे सांगितले. त्यानंतर भाजप आणि राष्ट्रवादीची बैठक झाली. राष्ट्रवादीकडून अजित पवार यांना पुढाकर देण्यात आले. बैठकीत ठरल्याप्रमाणे मी आणि अजित पवार यांनी सर्व तयारी केली. मात्र शरद पवारांनी शपथविधीच्या तोंडवरच तीन चार दिवसांपूर्वी शरद पवारांनी माघार घेतली.

## पंतप्रधान मोदी हे 'रोमच्या..

सुरुवातीला परवानगी दिली. मणिपूरची जनता हजारोंच्या संख्येने राहुल गांधींचे स्वागत करण्यास उभी होती. राहुल गांधी यांची लोकप्रियता पाहून भाजपा सरकार घाबरले आणि त्यांचा ताफा अडवून त्यांना परत पाठवले असल्याचा आरोप पटोले यांनी केला. राहुल गांधींना परत पाठवून स्थानिक लोकांवर पोलीसांनी अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या असल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे.

मणिपुरी जनता मोठ्या संख्येने राहुल गांधींना भेटण्यासाठी आलेली होती. पण भाजप सरकारने त्यांना लोकांना भेटू दिले नाही. मोदी सरकार राहुल गांधी यांना घाबरले आहे हे पुन्हा स्पष्ट झाले. राहुल गांधी प्रेम, बंधुभाव आणि शांततेचा संदेश घेऊन मणिपूर येथे पोहचले होते पण मोदी सरकारला मणिपूर शांत व्हावे असे वाटत नसावे म्हणूनच राहुल गांधींना रोखण्यात आले असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

# 'वैभव सोलापूरचे' या कॉफी टेबल बुकचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूरची कला, संस्कृती, साहित्य आणि जैवविविधतेची माहिती होवून पर्यटनामध्ये वाढ व्हावी, या उद्देशाने सोलापूर जिल्हा प्रशासन आणि वन विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या 'वैभव सोलापूरचे' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.शासकीय विश्रामगृह येथे आयोजित या कार्यक्रमाला महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, माजी मंत्री बबनराव पाचपुते आणि लक्ष्मणराव ढोबळे, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, आमदार सर्वश्री भरत गोगावले, समाधान आवताडे आणि शहाजीबापू पाटील, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील आदि उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त निधीतून या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून त्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, सहाय्यक वन संरक्षक बाबा हाके आणि लक्ष्मण आवारे यांचे सहकार्य लाभले.

या कॉफी टेबल बुकमध्ये सोलापूर जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले पुरातन काळातील शिल्प कलेचा यादव कालिन अर्धनारी नटेश्वर, माचणूर, पंढरपूर येथील विठ्ठलाचे मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, अक्कलकोट स्वामी समर्थ मंदिर, हेमाडपंथी भगवंत मंदिर, वडवळचे नागनाथ मंदिर, दहिगाव येथील जैन मंदिर, अक्कलकोट मधील खाजा सैफुल मलिक दर्गाह, सोलापुरातील फस्ट चर्च आदि धार्मिक स्थळांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यासोबत प्राचीन वारसा असलेला सोलापूर येथील भुईकोट किल्ला, मंगळवेढा, माढा, माचणूर, करमाळा, पिलीव येथील भुईकोट किल्ला, अक्कलकोट येथील राजवाडा, चार हुतात्मा स्मारक, सोलापूर महानगरपालिका इंद्रभवन, डॉ. कोटणीस स्मारक, वारकरी संप्रदायाची वारी परंपरा, महालिंगरायाची हुलजंती यात्रा, सिद्धरामेश्वराची गड्डा यात्रा, वडवळ नागनाथ यात्रा, उद्योग, कृषि पर्यटन केंद्र चिंचणी, कला व क्रीडा क्षेत्रातील सोलापूरचे योगदान, निसर्ग संपदा, जैवविविधता, सोलापूर शहराच्या मधोमध असलेले २०० हेक्टर क्षेत्रातील सिद्धेश्वर वनविहार, नान्नज येथील माळढोक पक्षी अभयारण्य यांचाही समावेश पुस्तकात आहे. याशिवाय या ठिकाणी आढळणारे विविध प्रकारचे शिकारी पक्षी, तृणभक्षक पक्षी, स्थलांतरीत होणारे पक्षी, फ्लेमिंगो (रोहित पक्षी), विविध सर्प प्रजाती, फुलपाखरे प्रजाती, विविध कोळी प्रजाती यांचाही समावेश या पुस्तकात करण्यात आला आहे.




## पंढरपूर तालुका काँग्रेसच्यावतीने भाविकांना फराळाचे वाटप

पंढरपूर /प्रतिनिधीः आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर नगरीमध्ये येणाऱ्या भाविक भक्तांसाठी मोफत फराळाचे वाटप पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा श्री हनुमंतराव मोरे साहेब यांनी वाटप केले ते गेल्या अनेक वर्षापासून समाज उपयोगी सामाजिक उपक्रम राबवत आहेत गेल्या अनेक वर्षापासून ते आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला येणाऱ्या वारकरी भक्तांसाठी मोफत फराळाचे वाटप करीत असतात याही वर्षी त्यांनी मोफत फराळाचे वाटप पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटी च्या वतीने करण्यात आले त्याप्रसंगी मा श्री राजकुमार टरले व मा श्री हरिश्चंद्र तळेकर मा श्री नामदेव कोरके मा श्री नागेश गावंधरे मा श्री शेखर मोरे मा श्री दिलीप कोरके व अशोक शेरखाने व दत्तात्रय शेरखाने व अशोक अवताडे व श्रीमंत कुंभार व इतर मान्यवर उपस्थित होते

## आषाढी एकादशीनिमित्या मैंदर्गी कन्नड मुली शाळेत विठोबाची पालखीचे मिरवणूक



अक्कलकोट/प्रतिनिधीः आषाढी एकादशीच्या औचित्य साधून विठुरायाचा पालखीचे मैंदर्गीच्या मुख्य रस्त्यातून व गल्लीतून पालखी घेऊन गावातील सर्वांना विठुरायाचा दर्शन घडवण्यात आले या पालखीचा मिरवणुकीचा वेळी वाद्य वृंद असलेले बँजो गाडी वापर करण्यात आली होती यावेळी विठ्ठल रुक्मिणीचा रूपात शाळेतील मुलींना वेशभूषा करण्यात आले होते

शाळेतील सर्व मुलींचा हातात झेंडे डोक्यावर तुळशीचा कळस घेऊन मुली हसत खेळत फुगडी खेळत गावातून मिरवणूक करण्यात आले.

यावेळी गावातील नागरिक माता पालक सर्वांनी विठुरायाच्या पालखी समोर पाणी घालून नारळ फोडून दर्शन घेत होते पूर्ण गावाला पंढरपूरचा स्वरूप आला होता अवघ्या मैंदर्गी विठुरायाचा गजराने दुमदुमले होते मिरवणुकीच्या वेळी गावकऱ्यांनी मुलींना ठिकठिकाणी पाणीचा सोय केले होते आणि चॉकलेट बिस्कीट व केळी मुलींना देत होते.

मिरवणूक झाल्यानंतर मुलींना प्रसाद म्हणून शाळेत खीर देण्यात आले या कार्यक्रमात गावकरी शाळा व्यवस्थापन समिती माता पालक सर्वांनी भाग घेतले होते तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश पाटील बसवराज हिप्परगी यांनी सहकार्य केले या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सुरेखा मसूती गीता शिवणगी विजया नाडगवडा विजयालक्ष्मी बहिरामडगी गुरनिंगप्पा शिवणगी रमेश जुजगार सीमा हिरतोट सुप्रिया बिराजदार आदींनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांनी केले होते मिरवणुकीचा शेवटी सर्व गावकऱ्यांचे आभार मानून दिंडीचे समाप्त करण्यात आले

# वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक

### इंडियन मॉडेल स्कूल या शाळेत विद्यार्थ्यांचा रिंगण सोहळा



अक्कलकोट/प्रतिनिधीः वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक आणि विठ्ठलनामाचा गजर', अशा विठ्ठल मय वातावरणात अक्कलकोट शहरातील इंडियन मॉडेल स्कूल या शाळेत विद्यार्थ्यांचा रिंगण सोहळा रंगला.

'वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक आणि विठू नामाचा गजर', अशा विठ्ठलमय वातावरणात अक्कलकोट शहरातील इंडियन मॉडेल स्कूल या शाळेत विद्यार्थ्यांचा रिंगण सोहळा रंगला. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, वासुदेव व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी रिंगण सोहळयात आकर्षण ठरले.

दरवर्षी प्रमाणे यंदाही इंडियन मॉडेल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये आषाढी एकादशी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या वेळी मूर्ती व पालखी पूजन अम्मा फौंडेशनच्या सचिवा शितलताई म्हेत्रे शाळेच्या मुख्याध्यापिका गौरी दाता मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी शाळेतील सर्व मुला-मुलींनी वारकऱ्यांचे पोशाख परिधान केले होते.

कोणी विठोबा तर कोणी वासुदेव बनले होते. सकाळी शाळेच्या मैदानावर पालखी सोहळा पार पड़ताच पंढरपुरच्या वारीप्रमाणेच रिंगणच देखिल ईथे आयोजन करण्यात आले होते, मुलांच्या हातात भगवे झेंडे तर मुलींच्या डोक्यावर तूळशी वृंदावन हे बघून हे जणू खरच पंढरपुरच्या वारीला निघाल्याचा भास होत होता.एरवी शाळेच्या गणवेशात असलेले लहान मुलं मुली आज मात्र पांढरा झब्बा, डोक्यावर टोपी, कपाळी बुक्का, गळ्यात टाळ आणि नऊवारीत आलेल्या मुली, केसात गजरा, डोक्यावर तुळस आणि विठ्ठल नामाची शाळा भरली, शाळा शिकताना तहान भूक हरली' या अभंगाप्रमाणे विठ्ठल रखुमाईच्या भक्तीत दंग झालेले बालक इंडियन मॉडेल स्कूल मध्ये अवतरले. यावेळी ज्ञानाच्या मंदिरात भोळ्या विठ्ठलाच्या हरिनामाचा गजर झाला. अन अवघी शाळा दिंडी सोहळ्याच्या भक्तीरसात तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले.

शाळेतील शिक्षिका नी टाकाऊ वस्तूंपासून दहा फुटी उंच विठ्ठलाचा मूर्ती बनवली होती ही मूर्ती शाळेतील रिंगण सोहळ्यात मध्य भागात उभी करण्यात आली होती

'जय जय राम कृष्ण हरी ,रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी, ज्ञानोबा माऊली तुकाराम' या अभंगांचे गायन करून टाळ व वीणा यांच्या तालावर ठेका धरत नृत्य तसेच विठ्ठल फुगडी खेळून प्रत्यक्षात श्रीक्षेत्र पंढरपुरातील भक्तिमय वातावरण इंडियन मॉडेल स्कूल या शाळेच्या क्रीडागंणावर निर्माण केले. विद्यार्थी आणि शिक्षकानी पारंपारिक वारकरी वेशभूषा, तुळशी व भगवद्धज घेऊनअभंगाच्या ठेक्यावर नृत्य व फुगडीचा आनंद घेऊन या नयनरम्य सोहळ्यात आपली भक्ती अभिव्यक्त केली.

रिंगण आटोपल्यावर टाळ मृदुंगाच्या गजरात विठूरायाची भजने गात आणि पसायदान म्हणत ह्या सोहळ्याचा शेवट झाला.

तर संस्थेचे अध्यक्ष सिद्धाराम म्हेत्रे उपाध्यक्ष अमोल जोशी सर संचालिका सायली जोशी मॅडम यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इंडियन मॉडेल स्कूल मधील सर्व शिक्षक शिक्षकेतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

## गेल्या सहा महिन्यात ४,४३४ ..

प्रश्नावरुनही केंद्र सरकारला काही प्रश्न विचारले आहेत. एकाच देशात दोन कायदे नको असं पंतप्रधानांनी म्हटल्याची माहिती आहे. त्यावर समान नागरी कायदा लागू करण्याचा विचार सुरू आहे. शीख समाज, जैन आणि इतर समाजांची भूमिका काय आहे हे स्पष्ट व्हाव. शीख समाजाचं वेगळं मत असल्याचं माझ्या कानावर आलं आहे. समान नागरी कायद्याला विरोध करण्याची भूमिका त्यांनी घेतल्याची माहिती आहे. कायदा आयोगाने सांगितल्याप्रमाणे सर्वांचं मत लक्षात घेऊन यावर निर्णय घ्यावं. शरद पवार पुढे म्हणाले की, समान नागरी कायदा लागू करण्याची बातमी सगळीकडे पसरवली जातेय, हे कुठल्यातरी महत्त्वाच्या प्रश्नावरुन लक्ष विचलित करण्यासाठी केलं जातंय का हे पाहावं लागेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना राष्ट्रवादीवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्याला आज शरद पवारांनी उत्तर दिलं. ते म्हणाले की, भाजपचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादीवर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. मी कोणत्याही बँकेचा सभासद नसतानाही माझ्यावर आरोप करण्यात आले. ज्यांच्यावर आरोप करण्यात आले त्यामध्ये भाजपचेही काही नेते होते. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून दंगली घडवल्या जात असल्याचं शरद पवार म्हणाले. ते म्हणाले की, कोल्हापूर, संगमनेर आणि इतर ठिकाणी दंगली घडवण्यात आल्या. या दंगली ठरवून घडवल्या जात आहेत. निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन या गोष्टी केल्या जात आहेत का हे तपासलं पाहिजे.




**ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षा तर्फे आषाढी एकादशी निमित्त पायी येणाऱ्या सर्व दिंडी व वारकरी बांधवांचे खासदार इम्तियाज जलील यानी आज स्वागत केले.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## गुरु पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर वटवृक्ष देवस्थानकडून विशेष दर्शन व्यवस्थेचे नियोजन

# भाविकांचे स्वामी दर्शन आणखी सुलभतेने होणार : महेश इंगळे



अक्कलकोट/प्रतिनिधीः येत्या गुरुपौर्णिमे रोजी हजारो स्वामी भक्त स्वामींच्या दर्शनाकरिता येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देणार आहेत. येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांना स्वामींचे दर्शन प्रती वर्षापेक्षा यावर्षी आणखीन सुलभतेने व्हावे याकरिता श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कडून विशेष दर्शन व्यवस्थेचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

पुढे बोलताना इंगळे यांनी येथील वटवृक्ष निवासी श्री स्वामी समर्थ महाराज हे दत्तात्रयांचे चौथे अवतार आहेत. ते गुरूंचे गुरु, सद्गुरूंचे गुरु आहेत यामुळे येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात प्रतिवर्षा प्रमाणे यंदाही ३ जुलै गुरुपौर्णिमे रोजी स्वामींना गुरु मानणारे हजारो स्वामीभक्त गुरु भेटीची संधी साधून स्वामी दर्शनाकरिता येणार आहेत. येणाऱ्या स्वामी भक्तांना मंदिर परिसरात बॅरेकेटिंग व यंदा प्रथमच विशेष पध्दतीने गाभाराच्या मागील बाजूतील हॉलमध्ये बॅरेकेटींग करून दर्शन रांगेची विशेष व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्यामुळे आता भाविकांना टप्प्या टप्प्याने दर्शनास सोडण्याचा प्रश्नच राहणार नाही. सरळ सरळ रांगेत दर्शन होणार असल्याने भाविकांना कोणताही नाहक त्रास होणार नाही.

त्यामुळे प्रतिवर्षापेक्षा यंदा अधिक सुलभ स्वामी दर्शनाचा अनुभव भाविकांना अनुभवता येईल असेही मनोगत इंगळे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, गिरीश पवार, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

## रेणुका पब्लिक स्कुल व कॉलेज ऑफ एज्युकेशन बी.एड,डी. एड.मध्ये वारकरी दिंडी उत्साहात साजरी!



कळंब/प्रतिनिधीः रेणापूर जि लातूर. रेणापूर येथील प्रा.शिवराज मोटेगावकर शैक्षणिक संकुलातील रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याच्या वारकरी दिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठोबा आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वारकरी दिंडी काढण्यात आली.

विठ्ल - रुक्मिणीची,संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्र्वर महाराज, व वारकरी यांच्या वेशभूषा करून विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. दिंडी मध्ये विद्यार्थ्यांनी पाउले,फुगडी, पथनाट्य , अभंग सादर केली.

वारकरी दिंडी पालखीची पूजा प्राचार्य,डॉ.कैलास मोटे ,प्रा.श्री.चिलरगे शशिकांत ,प्राचार्य बाबाहेब बरीदे सर,हेमा मोटेगावकर मॅडम, व इतर स्टाफ यांच्या हस्ते करण्यात आली. दिंडीचे स्वागत रेणुका माता मंदिर येथे रेणुका एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ, मिनल शिवराज मोटेगावकर, यांच्या हस्ते देवीची पूजा करून करण्यात आला.

वारकरी दिंडी संस्थेचे सचिव प्रा.शिवराज मोटेगावकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. दिंडीमध्ये ,प्रा रतन लहाने ,प्रा. उमेश रणदिवे ,प्रा रविंद्र सावलकर , डॉ शेटकर मॅडम,प्रा राधिका माने, रेणुका पब्लिक स्कूलचा सर्व स्टाफ,विद्यार्थी तसेच रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन चे सर्व छात्र अध्यापक अध्यापिका उपस्थित होते.न भूतो न भविष्यती सोहळा सर्व गावकऱ्यांनी पहिला.

# आषाढी एकादशी वारी म्हणजे वारकऱ्यांचा महाप्रपंच : ह.भ.प.दादा महाराज सोनटक्के



अक्कलकोट/प्रतिनिधी :आषाढी एकादशी हि महाराष्ट्राची महाउपासना आहे. हि उपासना करीत वारकरी दरवर्षी सावळ्या विठ्ठलाला भेटण्याची ओढ मनात साठवून पायी पंढरीची वारी करतात. हि वारी म्हणजे वारकऱ्यांचा एक महाप्रपंच असतो असे निरूपण धाराशीव येथील कीर्तनकार ह.भ.प.दादा महाराज सोनटक्के यांनी केले. आज आषाढी एकादशी निमीत्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित ए.वन चौकातील उपलप विठ्ठल मंदिरात आयोजित किर्तन सेवेत निरूपण करताना ते बोलत होते. किर्तन सेवेच्या प्रारंभी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी ह.भ.प.दादा महाराज सोनटक्के यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. कीर्तन सेवेत पुढे बोलताना दादा महाराज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एका क्रांतीपर्वाची सुरुवात महाराष्ट्रातील संतांनी केली. त्याची जोपासना करण्याचं काम आज लक्षावधी वारकरी ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल म्हणून पंढरीच्या दिशेने वाटचाल करतात ते केवळ विठ्ठल दर्शनाची आस घेऊनच.

पंढरीच्या वाटेने निघालेला वारकरी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक शिखरावरचा सोनेरी कळस आहे. त्याची लकाकी आषाढी एकादशीनिमीत्त लाखोंच्या संखेने पंढरीच्या दिशेने पायी वाटचाल करणाऱ्या वारकऱ्यांच्या या वारीतून दिसून येत असल्याने समस्त भक्तगण या वारीतही विठ्ठलाचे रूप पाहून धन्य होतात असेही

निरुपण दादा महाराज यांनी या कीर्तन सेवेत केले. त्यांना उस्मानाबाद येथील अजानुबाहू वारकरी शिक्षण संस्था, व औसा चिकुर्डा येथील विठ्ठल भजनी मंडळाच्या वारकऱ्यांनी साथ संगत केली. किर्तन सेवेच्या प्रारंभी आज आषाढी एकादशी निमित्त मंदीरातील विठ्ठल रुक्मिणी देवतांस वटवृक्ष देवस्थानकडून समितीचे चेअरमन महेश इंगळे व पुणे येथील विठ्ठल मंदिर व्यवस्थापन समितीचे सदस्य श्रीमती आरती उपलप यांच्या हस्ते पुरोहित राघवेंद्र बागेवाडीकर व दिपक बागेवाडीकर, मनोहर देगांवकर यांच्या मंत्रोच्चारात पहाटे ५ वाजता महाअभिषेक महापुजा संपन्न झाली. यानंतर विठ्ठल मंदीर पटांगणात सकाळी ७ ते ९ या वेळेत मराठवाडयातील श्री.विठ्ठल भजनी मंडळ (चिकूर्डा, जि.लातूर) व अजानुबाहू वारकरी शिक्षण संस्था (उस्मानाबाद) यांची भजनसेवा श्रींच्या चरणी समर्पित झाली. तदनंतर सकाळी ९ ते ११ या वेळेत उस्मानाबाद येथील ह.भ.प. दादा महाराज सोनटक्के यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. या एकादशी निमित्त संपूर्ण विठ्ठल मंदिरास विद्युत रोषणाई करून सजविण्यात आले होते. एकादशी निमित्त येणाऱ्या वारकरी भाविकांना श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने चेअरमन महेश इंगळे व विश्वस्त आरती उपलप यांच्या हस्ते उपवासाचे शाबू खिचडी, केळी प्रसाद, चहा, कॉफी इत्यादी फराळ प्रसादांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, पुरोहित राघवेंद्र बागेवाडीकर, दीपक बागेवाडीकर, मनोहर देगावकर, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, दयानंद हिरेमठ, शिवशरण अचलेर, संतोष फुटाणे-जाधव, संतोष पराणे, ऋषिकेश लोणारी, श्रीशैल गवंडी, संजय पवार, गिरीश पवार, सागर गोंडाळ, संजय मोरे, स्वाती गाडे-जाधव, वंदना शिर्के, शशिकला मडीखांबे, जयश्री माने, सोनी चव्हाण, रविराव महिंद्रकर, खाजप्पा झंपले, चंद्रकांत सोनटक्के, श्रीमुख जगदाळे, संतोष जमगे, महादेव तेली, दिपक जरिपटके, प्रसाद सोनार, मल्लीनाथ बोदले, चंद्रकांत डांगे, चंद्रकांत गवंडी आदींसह अनेक भाविक व वारकऱ्यांनी उपस्थित राहून या कीर्तन सेवेचा व श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. आज दिवसभर येथील स्थानिक भाविकांसह परगांवाहून आलेल्या भाविकांनी मोठ्या संखेने श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेवून कृतार्थ झाले.

## चंद्रभागा नदीमध्ये बुडणाऱ्या दोन भाविकांचा पंढरपूर नगर परिषदेच्या पथकाने त्यांना वाचवले



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मध्ये आषाढी यात्रेच्या निमित्ताने लाखो भावी श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे दाखल झाले आहेत या आषाढी यात्रेनिमित्त आलेली भाविक अतिशय श्रद्धेने चंद्रभागेचे स्नान करून श्री विठ्ठलाचे दर्शन घेत असतात या यात्रेच्या निमित्ताने कृष्णा भंडारे व आणखी एक चंद्रभागेमध्ये स्नान करत असताना पाण्याचा अंदाज न आलेल खोल पाण्यात बुडत असल्याचे नगर परिषदेचे नदीपात्रामध्ये गस्त घालत असलेल्या पथकाच्या निदर्शनास येतात सदर बोटीमध्ये असलेले श्री गणेश तारे दुसरी अक्षय भोसले यांनी नदीपात्रात उडी घेत लाइफ रिंग दोरीच्या साह्याने त्या भाविकाच्या जीव वाचला असल्याची माहिती अग्निशमन अधिकारी संभाजी कारले यांनी दिली

सध्या नदीपात्रामध्ये नागरिकांना खोल पाण्यात जाऊ नये म्हणून स्वीकार द्वारे सूचना दिल्या जात आहेत तसेच कोणतीही दुर्घटना घडून ये म्हणून नगरपरिषद ची टीम नदीपात्रामध्ये पहाटेपासून संध्याकाळ होईपर्यंत गस्त घालत असते तरी भाविक खोल पाण्यात जाऊन ये ही आपल्या जीवाची काळजी घ्यावी असे आव्हान मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी केले आहे व ज्या कर्मचाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून भाविकांना जीव वाचवायला त्या कर्मचाऱ्यांचे मुख्याधिकारी अरविंद माळी उपमुख्य अधिकारी सुनील वाळूजकर त्यांनी अभिनंदन केले आहे

# सभासदांच्या निष्टेचाच विजयी झाला : दिनकर कदम




पंढरपूर/प्रतिनिधीः कारखान्याच्या निवडणूक प्रसंगी अनेक आरोप प्रत्यारोप करण्यात आले. परंतु आम्हाला खात्री होती की सभासदांचा आमच्यावर विश्वास आहे. सभासदांनी दाखविलेल्या त्या विश्वासाच्या जोरावरच आम्ही निवडणुकीला सामोरे गेलो. त्यामुळे या निवडणुकीमध्ये सभासदांच्या निष्ठेचा खऱ्या अर्थाने विजयी झाला. असे प्रतिपादन सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे संचालक दिनकर कदम यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथे जनहित शेतकरी संघटनेचे नेते औदुंबर गायकवाड यांच्या निवासस्थानी सहकार शिरोमणी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये विजयी झाल्याबद्दल दिनकर कदम यांचा तर काँग्रेसच्या माथाडी कामगार सेलच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अशोक पाटोळे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिनकर कदम बोलत होते. या कार्यक्रमाप्रसंगी तानाजी पवार, पोपट भोसले, नारायण कदम, अशोक गायकवाड, महादेव गायकवाड, धनंजय चव्हाण, राजाराम गायकवाड, ह भ प तांबे महाराज, भारत गायकवाड, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना दिनकर कदम म्हणाले की, या निवडणुकीमध्ये सभासदांनी जो आमच्यावर विश्वास टाकला आहे. तो विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कारखान्याच्या माध्यमातून भविष्यामध्ये चांगल्या स्वरूपाचे कार्य करू.

त्याचप्रमाणे ज्या काही चुका असतील त्या चुका पुन्हा होऊ नये म्हणून यापेक्षाही अधिक चांगले कार्य करू अशी ग्वाही दिली. तर यावेळी औदुंबर गायकवाड यांनी सभासदांनी जो विश्वास टाकला आहे तो विश्वास सार्थ ठरविण्यासाठी संचालक मंडळाने सर्व उत्कृष्ट कामकाज करून समस्या मुक्त करण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. यावेळी अशोक पाटोळे, अशोक गायकवाड, तांबे महाराज यांनी मनोगते व्यक्त केली. तर उपस्थितांचे आभार गायकवाड यांनी मानले.

## शब्दकोडे क्र ४४



आडवे शब्द १.सुलभ मिळालेले,कष्ट न घेता ३.गुजरातमधील एक प्रसिद्ध शहर ५.गोलमाल चित्रपटाचा नायक ९.किंमत,भाव १०.कारण,निमीत्त १२.सूर्य,दही घुसळण्याचे साधन १३.२६जानेवारी १६.जहाजात वापरण्यात येणारे एक दिशा दाखण्याचे यंत्र १९.धाक,जरब २१.हिसका,दचका २३.रात्री घातलेली पाळत २४.आंब्याचा रस २६.रमरम उलटे करा ३०.इंग्रजीत झाड ३१.क्रौच,एक पक्षी ३३.फणसाची एक जात ३६.पुरे,बेस्टचे एक वाहन ३७.दणकट,राकट ३९.एक मोठा व सुस्त साप ४०.चाट,थाप ४२.ज्याला वारीस नाही असा हिंदीत ४४.पाठवणी,बिदागी ४५.हिंदीत कालचा ४६.अफुचे बी ४८.संत,महंत ४९.मगर ५१.कमीत कमी ५३.एक ताणला जाणारा पदार्थ ५४.काजळ,अंजन हिंदीत ५५.मातीसारखी चव असेलेले ५७.ताजा,तवाना ६०.धारण करणारा ६१.मध ६३.विश्व ६४.संक्रांतीला स्त्रीया हे लुटतात ६५.लहान मुलींचा फ्रॉक ग्रामिण ६७.पावा,बासरी ७०.कढविलेला ऊसाचा रस ७२.मोहन उलटे करा ७३.आरंभ,श्रीगणेशा ७५.हरवणे,गडप ७६.घोडयाला काबुत ठेवण्यासाठी आवश्यक ७७.रानातला मेवा ७८.अजय देवगण,करीश्मा कपुर,जीवन,परेश रावल यांचा एक चित्रपट

उभे शब्द १.सडक,आँखे आदी चित्रपटात खलनायक तथा हास्यकलाकाराचे काम करणारा एक नट २.अमिताभ बच्चन,किमी काटकर यांचा 'जुम्मा चुम्मा'या गीताचा चित्रपट ३.बरकत,भरभराटीचा काळ ४.त्रास,यातना ५.शेवट,अंत ६.मुलगा हिंदीत ७.हात,हस्त ८.आठवडयातील सुटीचा वार १०.शासन,शिक्षा ११.बहुजन समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप १३.धडा,पाठ,मामला १४.कारल्याची चव,कडवट १५.वस्तु,पर्वत १६.संमती कळवणे,मान्य १७.इंग्रजीत तरूणासारखा १८.त्रासलेला २०.स्वयंपाक घरातील एक साधन २२.वीस उभेचे उत्तर २५.पाण्याचा संतत पडणारा बारीक प्रवाह २७.कामदेव,रतीपती २८.एक उंच उडणारा पक्षी ३१.सोन्याची परीक्षा,सत्व ३२.मोठा विळा ३३.चांगला,भला ३४.लोखंड साफ करण्याचे साधन ३५.प्रायव्हेट मराठीत ३६.सुबत्ता,भरभराट ३७.धाण्याचा तुरा ३८.समाप्त हिंदीत ३९.सतत,अखंड ४०.महाभारतातील एक राक्षस ४१.जमीन साफ करण्याचे एक शेतकी साधन ४३.खाली,रिक्त ४७.एक मराठी आडनाव ४८.सोबत रांगेत बसुन जेवणे ५०.मनाची तृप्ती ५१.किडा,कृमी ५२.रोख,पैसे देऊन ५४.मुलगा,धागा ५५.वानर,कपी ५६.इंदिराजींच्या आईचे नाव ५८.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक क्रिया ५९.गाण्याचा सराव ६२.रंजन करणारे ६३.जामीन घेणे,हमी ६४.गाईचे बाळ ६६.गाजावाजा,बोभाटा ६७.ज्याचे मोल करता येत नाही असे ६८.हिंदीत दास,अमीर खान,राणी मुखर्जी यांचा 'आती क्या खंडाला' गाण्याचा चित्रपट ६९.पडणे,ऱ्हास ७०.चिंता,फिकीर ७१.इंग्रजीत विजेता ७३.मुलाची बायको ७४.पवन,वात

# संविधान कोणीही बदलु शकत नाही बदलण्याचा जे विचार करतील जनता त्यांनाच बदलुन टाकते : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले




मुंबई : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान जगातील सर्वश्रेष्ठ संविधान आहे. हे संविधान कोणताही पक्ष ;कोणतीही ताकद कधीही बदलवु शकत नाही. तसेच कोणतेही सरकार आले तरी भारताचे संविधान बदलु शकत नाही. ज्यांनी संविधान बदलण्याचा विचार केला

त्यांना जनताच बदलुन टाकते असा इतिहास आहे. संविधान बलण्यापेक्षा संविधानाच्या विचारानुसार आपल्यामध्ये बदल घडविला पाहिजे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे संविधानातला भारत उभा करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. म्हणून त्यांना आमची साथ आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

पुणे येथील मुळशी तालुक्यातील मूळशीखुर्द या गावातील ग्रामपंचायतिच्या नवीन सुसज्ज कार्यालयाचे लोकार्पण ना.रामदास आठवले यांच्या हस्ते झाले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणुन ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी विचारमंचावर महाराष्ट्राचे माजीमंत्री महादेव जानकर, माजी आमदार शरद धमाले, मुळशी खुर्द ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. वंदना श्रीकांत कदम, रिपाइंचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे, श्रीकांत कदम, विक्रम शेलार, वाडेकर, बाळासाहेब जानराव, अशोक कांबळे, बाळासाहेब भागवत, बाळासाहेब ओव्हाळ; सतीश केदारी; विनोद चांदमारे, सुनिल पासलकर, लक्ष्मण भालेराव, केदार धमाले, प्रविण निकाळजे, विजय, बनसोडे, प्रविण गांगुर्डे, अविनाश गांगुर्डे असे आदि मान्यवर उपस्थित होते. ग्रामसेवक निलीमा अनिल सावंत, बीडीओ संजय धमाळ, नायब तहसिलदार श्रीकांत मिसाळ; तलाठी विवेक अवचारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अन्नछत्र हे तेजस्वी, ओजस्वी, सबल बनविण्यारे केंद्र : नितीन बानुगडे-पाटील

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव

अक्कलकोट/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकाळातील परंपरा जपण्याचे कार्य श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले हे करीत आहेत. अन्नछत्र हे तेजस्वी, ओजस्वी, सबल बनविण्यारे केंद्र आहे. ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज या धर्म कार्याला कोणतीच अडचण येऊ देणार नांहीत असे प्रतिपादन ख्यातनाम व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून गुरुवार सायंकाळी ७ वा. 'व्याख्यान' विषय - सेवाभाव-अन्नदान व छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर ख्यातनाम व्याख्याते नितीन बानुगडे-पाटील यांचे व्याख्यानाने ७ वे पुष्प संपन्न झाले.

पुढे बोलताना नितीन बानुगडे-पाटील यांनी म्हणाले की, आंध्रप्रदेश येथील श्रीशैल मल्लिकार्जुन मंदिराकडे येण्या-जाण्याकरिता त्याकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी घाट बांधले. त्यांचे हे मोठे महान कार्य पाहून, घाट बांधणाऱ्या मजुरांनी स्ववर्गणीतून मंदिराच्या गोपुराच्या उत्तर बाजूस असलेल्या चौथ्या मजल्यावरील कमानीत छत्रपती शिवाजी





महाराजांची कोरीव मुर्ती आजही पाहायला मिळते. छत्रपतींच्या काळातील जिवंत स्मारक असल्याचे सांगून, कर्नाटक राज्यातील छत्रपतीनी स्वराज्यसाठी केलेल्या कार्याबाबत संपूर्ण माहिती त्यांच्या खास शैलीत सांगितले.

शिवरायांडून कसे जगावे हे शिकावे तर संभाजी राजांकडून कसे मरावे हे शिकावे. प्रतिकूल परिस्थिती अनकूल कशी करावी हे छत्रपती संभाजी राजांचे चरित्र अभ्यासले की लक्षात येतो. आपला इतिहास उज्वल आहे. तसाच आपला वर्तमान व भविष्यकाळही उज्वल करता आला पाहिजे, असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले. अन्नदान हे श्रेष्ठ दान असून, भोसले पिता-पुत्रांनी तीर्थक्षेत्र अक्कलकोटात स्वामी भक्तासाठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ

**गुणीजन गौरव : यामध्ये विशेषगौरव पुरस्कार धनेश आचालेर, बोरामणी व अक्कलकोट ग्रामीण सर्कल (महसूल क्षेत्र) ओंकार माने, पंचायत समितीचे रंगनाथ निकम, प्रा. प्रकाश सुरवसे, युवा उद्योजक सचिन उपरे, गोगावाचे माजी सरपंच प्रदीप जगताप यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**शुक्रवार दि. ३० जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'रंग विनोदाचे, रंग सुरांचे' सादरकर्ते - श्रेया बुगडे, भाऊ कदम, कुशल बद्रिके, मेघना एरंडे व गायक- स्वप्नील गोडबोले, योगिता गोडबोले आणि सहकारी मुंबई यांचा कार्यक्रम होणार आहे.**

स्थापन करून, एक मातृत्व संस्था कार्याच्या माध्यमातून धार्मिक कार्याबरोबरच समाज उपयोगी कार्य त्यांच्या हातून घडत आहे. अन्नछत्र हे संवेदनशीलतेचे प्रतिबिंब आहे. याबरोबरच छत्रपतींच्या इतिहासासह चालू घडामोडीवर त्यांनी विवेचन करून न्यासाच्या परिसरात शिवस्मारक व धातुशिल्प हे दालन कुठेच पाहायला मिळत नांही असे सांगून मंडळाच्या कार्याची कौतुक केले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन आमदार चैनसुख संचेती, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, दिलीपभाऊ कोल्हे, अशापक बळोरगी, दिलीप सिद्धे, संजय देशमुख, वैभव नागणे, अभिनंदन गांधी, बाबासाहेब निंबाळकर, मोहन डांगरे, प्रमोद मोरे, विश्वनाथ भरमशेट्टी, महेश हिंडोळे, रमेश बारस्कर, शेखर, अभिजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले, शैलशिल्पा जाधव, शुभांगी जाधव, व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त राजेंद्र लिंबीतोटे, लाला राठोड, संतोष भोसले, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्वर उटगे, मनोज निकम, वैभव नवले, शिवराज स्वामी, प्रा.शरणप्पा अचलेर, शितल जाधव, जवहार जाजू, शेखर फंड, महादेव



भोसले, सनी सोनटक्के, प्रथमेश इंगळे, स्वामीराव मोरे, योगेश पवार, रोहित खोबरे, श्रीकांत मलवे, अतिश पवार, संजय गोंडाळ, पिटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, विराज माणिकशेट्टी, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, अरविंद शिंदे, प्रथमेश पवार, सौरभ मोरे, राहुल इंडे, महादेव अनगले व राजेंद्र पवार, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, प्रसन्न बिराजदार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, किरण जाधव, सागर शिंदे, गणेश गोब्बुर, अप्पाशा किवडे, बाळासाहेब मोरे, रोहन शिर्के, अरविंद शिंदे, अप्पू कलबुर्गी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले.

# नळदुर्ग शहरात आषाढी एकादशी निमित्त टाळ मृदंगाच्या गजरात पालखी सोहळा संपन्न

नळदुर्ग/प्रतिनिधीः दादासाहेब बनसोडे आषाढी एकादशी निमित्त दि.२९ जुन रोजी मराठा गल्ली येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळाच्या वतीने शहरांतुन माऊलीची भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये शहरांतील नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बाल वारकऱ्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणीसह विविध संतांच्या वेशभुषा करून मिरवणुकीत सहभागी झाले होते.

दि.२९ जुन रोजी संपुर्ण राज्यात आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. नळदुर्ग शहरातही आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी मराठा गल्ली येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळाच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त शहरांतुन भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. मराठा गल्ली येथुन सुरू झालेली पालखी मिरवणुक पांचपीर चौक, भोई गल्ली, क्रांती चौक, चावडी चौक, भवानी चौक, राममंदिर, सावरकर चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक मार्गे मराठा गल्ली अशी काढण्यात आली. यावेळी भजनी मंडळाचे भजन, अभंग यासह पंढरीनाथ महाराज की जय च्या जयघोषात ही मिरवणुक निघाली.



पालखी मिरवणुक निघाल्यानंतर माऊलीचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येक चौकात नागरीकांनी गर्दी केली होती. वसंतराव अहंकारी गुरुजी यांच्या निवासस्थानी पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. तर माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी पांडुरंगाची पुजा करण्यात आली यावेळी अहंकारी यांच्या वतीने नागरीकांना केळीचे वाटप करण्यात आले.

नळदुर्ग पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सिद्धेश्वर गोरे यांनी माऊलींची पालखी खांद्यावर घेण्याबरोबरच पालखी मिरवणुकी समोर फुगडी खेळण्याचाही आनंद लुटला. यावेळी बलभीमराव मुळे, पोलिस उपनिरीक्षक श्री पटेल,माजी नगरसेवक बसवराज धरणे, विनायक अहंकारी, महालिंग स्वामी,सरदारसिंग ठाकुर , ज्योतीबा येडगे , मिलिंद भुमकर गणेश शेंडगे , माने आदींनी फुगडी खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.

पालखी मिरवणुकीत श्री संत ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळाचे सौ. सुक्ष्म माने, सुभद्राताई मुळे,सुमन किल्लेदार, विमल काळे, सरुबाई महाबोले,छायाबाई मुळे, शोभा ठाकुर,लक्ष्मी किल्लेदार, अरविंद माने, दौलतराव खाटमोडे,नेताजी किल्लेदार, मिलिंद भुमकर,महेश कलशेट्टी, मोहीत कलकोटे,गुंडू जगताप, तानाजी जाधव, ज्ञानेश्वर गव्हाणे, किसन जाधव, जगन्नाथ गायकवाड, बळीराम पाटील, कोंडीबा जाधव यांच्यासह माजी नगरसेवक सुधीर हजारे, विलास येडगे, सुहास येडगे, तानाजी जाधव, उमेश जाधव, रमेश जाधव, रघुनाथ नागणे, संजय विठ्ठल जाधव, बंडप्पा कसेकर, अमोल सुरवसे यांच्यासह नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक सिद्धेश्वर गोरे यांनी मिरवणुक मार्गावर कडक पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

# भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पर्यावरण संवर्धन गरजेचे : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' उपक्रमाचा समारोप

पंढरपूर/प्रतिनिधी :भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पर्यावरण जतन व संवर्धन गरजेचे असून, 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमातून याबाबत जनजागृती होत आहे. अशा उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाची लोकचळवळ झाली व्हावी, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण वातावरणीय बदल विभागाच्यावतीने आयोजित 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा, डॉ. तानाजी सावंत, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, आमदार सर्वश्री भरत गोगावले, समाधान आवताडे, शहाजीबापू पाटील, बबनराव पाचपुते आणि बालाजी कल्याणकर, पर्यावरण विभागाचे सचिव प्रविण दराडे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर आदि उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, 'पर्यावरणाची वारी-पंढरीच्या दारी' या उपक्रमाचे अखंडितपणे गेल्या तेरा वर्षापासून आयोजन करण्यात येत असून ही पर्यावरण आणि आरोग्याची वारी आहे. वारीमध्ये पोवाडा, भारुड, कीर्तन, गोंधळ अशा पारंपरिक लोककलेच्या माध्यमातून नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले आहे. पर्यावरण वारीच्या माध्यमातून एक प्रकारची लोकचळवळ उभी राहत आहे. आज वातावरणीय बदलामुळे अवेळी पाऊस, गारपीट, बर्फ वितळणे, समुद्राच्या पाण्याची पातळीमध्ये वाढ अशी पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची चिन्हे दिसत असून अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे. हे टाळण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करायला पाहिजे, प्लास्टिकचा वापर टाळला पाहिजे, पाण्याची व विजेची बचत केली पाहिजे.

पर्यावरण संवर्धनासाठी राज्य शासन आग्रही असून गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, जलयुक्त शिवार यासारख्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जात आहे. वृक्षसंवर्धन आवश्यक असून



यासाठी अनेक सामाजिक संस्था सोबत आहेत. याबाबत जनजागृती होण्याची गरज आहे. पर्यावरण विभाग व प्रदूषण नियंत्रण मंडळ खूप मोठ्या प्रमाणात काम करीत आहे. शासनासोबत आपण सर्वजण काम करुन ही लोकचळवळ व्हावी यासाठी प्रत्येकाने जबाबदारी घेतली पाहिजे. स्वच्छता ही आरोग्याच्यादृष्टीने महत्वाची आहे. पंढरपूर स्वच्छ करण्यासाठी लोकप्रतिनिधी सोबत जिल्हा प्रशासन काम करीत आहे. यावर्षी वारकऱ्यांची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन योग्य प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक वारकरी हा सुखरूप घरी गेला पाहिजे. या वर्षी शासनाच्यावतीने वारकऱ्यांना एक लाखाचे विमा कवच दिले आहे, असे श्री. शिंदे म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आदी मान्यवरांच्या समवेत ज्ञानोबा माऊली तुकाराम, 'ज्ञानोबा-माऊली तुकाराम' गजर करत कलावंतासोबत पाऊली खेळली.

सचिव प्रविण दराडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. प्रकाश खांडगे, शाहीर देवानंद माळी, चंदाबाई तिवडी, ज्ञानेश्वर महाराज वाबळे आदि उपस्थित होते.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्वच्छता दिंडीचा समारोप

# पंढरीची वारी व पालखी सोहळ्याच्या माध्यमातून स्वच्छतेचा मूलमंत्र राज्यातील घराघरात पोहोचेल, आषाढी वारीत स्वच्छतेचे उत्तम नियोजन : मुख्यमंत्री शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरीची वारी व पालखी सोहळ्याच्या माध्यमातून स्वच्छतेचा मूलमंत्र राज्यातील घराघरात पोहोचेल आणि स्वच्छता अभियान लोकचळवळ बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर येथे स्वच्छता दिंडी समारोप समारंभात बोलताना व्यक्त केला. पंचायत समिती पंढरपूरच्या आवारात पाणी पुरवठा व स्वच्छता आणि ग्रामविकास विभागाच्या वतीने आयोजित श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील स्वच्छता दिंडी व ग्रामसभा दिंडी २०२३ समारोप मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाला, यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, आरोग्य मंत्री तानाजी सावंत, आमदार भरत गोगावले, आमदार मंगेश चव्हाण, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, गेल्या १७ वर्षापासून स्वच्छता दिंडी काढण्यात येत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केल्यामुळे नागरिक स्वच्छतेबाबत जागरुक झाले आहेत. स्वच्छतेची लोकचळवळ होणे ही समाधानकारक बाब आहे. पंढरपूर येथे सांडपाणी व्यवस्थापन, प्लास्टिक बंदी, कचरा व्यवस्थापन चांगल्यारितीने झाले आहे. पंढरपूरच्या वारीला शतकानुशतकांची परंपरा आहे. यात मोठ्या प्रमाणात वारकरी सहभागी होतात. त्यामुळे शासन-प्रशासनाची जबाबदारी वाढते आहे. अशावेळी स्वच्छतेचे नियोजन आणि इतर सुविधा चांगल्याप्रकारे देण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. विशेषत: स्वच्छतेवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. शासन वारकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगून त्यांनी स्वच्छता दिंडीत सहभागी वारकरी बंधु-भगिनींचे अभिनंदन केले.

वारकाऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील सर्व जनतेला देण्याचा आणि ७०० ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्याचा निर्णय शासनाने मंत्रीमंडळ बैठकीत घेतला आहे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.




यावर्षीच्या आषाढी वारीत पंढरपूर येथे स्वच्छतेचे चांगले नियोजन करण्यात आले आहे. प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी चांगले काम केल्याचे श्री.शिंदे यांनी सांगितले.यावेळी गरीब कुटुंबातील विद्यार्थीनींना ग्रामविकास मंत्री श्री.महाजन यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात वितरण करण्यात आले. पंढरपूर पंचायत समितीतर्फे ३०० विद्यार्थीनींना सायकल देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात 'सायकल बँक'च्या माध्यमातून ३ हजार विद्यार्थीनींना सायकल देण्यात आल्या आहेत.

प्रास्ताविकात श्री. स्वामी यांनी स्वच्छता दिंडीविषयी माहिती दिली. स्वच्छता दूतांचा सन्मान करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या १७ वर्षापासून या दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे. दोन्ही पालखी मार्गावरील ७४ ग्रामपंचायती सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गांवर येतात. या मार्गावर स्वच्छतेसोबत स्नानगृह, महिलांना आरोग्य सुविधा, फिरते आरोग्य पथक आदी सुविधा देण्यात आल्याने वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी सोलापूर जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक दत्तात्रय येवडे आणि संजय बिदरकर यांनी जनजागृतीपर सादरीकरण केले.